# ‘पूरिया धनाश्री’ने भरले सवाई महोत्सवात रंग

## दिग्गज कलाकारांच्या अदाकारीने पुणेकर रसिक भारावले

**पुणे, ता. १० :** आपल्या तडफदार आवाजाने ‘पूरिया धनाश्री’मध्ये अनोखे रंग भरत सावनी शेंडे-साठ्ये या पुण्याच्या युवा गायिकेने रसिकांना भारून टाकले. मोहनवीणा-मेंडोलिन जुगलबंदी आणि संगीतमार्तंड पं. जसराज यांची रससिद्ध गायकी हे सवाई गंधर्व संगीत महोत्सवाच्या शुक्रवारच्या सत्राचे आकर्षण ठरले.

रामपूर सेहसवान घराण्याच्या उमा गर्ग यांच्या गायनाने दुसऱ्या सत्राची सुरवात झाली. त्यांनी ‘मुलतानी’ रागानंतर ‘मिश्र खमाज’मधील ठुमरीमध्ये रंग भरला. त्यांना सुयोग कुंडलकर यांनी हार्मोनिअमची आणि भरत कामत यांनी तबल्याची; तर कांचन लघाटे आणि नीला वैद्य यांनी तानपुऱ्याची साथ केली.

सवाई गंधर्व संगीत महोत्सवातील स्वरमंचावर सावनी शेंडे-साठ्ये यांची पदार्पणातील मैफल गाजली. त्यांनी विलंबित एकताल, मध्य लय द्रुत त्रितालात अशा दोन बंदिशी आणि त्याला जोडूनच आडा चौतालातील तराणा सादर करीत ‘पूरिया धनाश्री’ रागाची सौंदर्यस्थळे उलगडली. त्यांना सुयोग कुंडलकर यांनी हार्मोनिअमची आणि रामदास पळसुले यांनी तबल्याची समर्पक साथसंगत केली. अनुराधा पटवर्धन आणि मधुरा गद्रे यांनी तानपुऱ्याची साथ केली. ‘हेमंत’ रागातील एकतालाची बंदिश सादर केल्यावर त्यांनी ‘बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल’ या अभंग गायनातून भक्तिरसाची प्रचिती दिली.

पं. विश्वमोहन भट्ट आणि पं. यू. श्रीनिवास यांची मोहनवीणा आणि मेंडोलिनवादनाची जुगलबंदी रंगली. त्यांनी गायकी अंगाने वादन करीत सहवादनाबरोबरच जुगलबंदीचा अनोखा प्रत्यय देत ‘यमन’ राग फुलविला. त्यांना विजय घाटे यांनी तबल्याची उत्तम साथसंगत केली. ‘वैष्णव जन तो’ या भजनाची धून सादर करून त्यांच्या वादन मैफलीची सांगता झाली. या मैफलीपूर्वी महोत्सवाचा चार तपांचा इतिहास ‘भारलेल्या या स्वरांनी भारलेला जन्म हा’ या पुस्तकामध्ये शब्दबद्ध करणारे सुधाकर धायगुडे यांचा अमृतमहोत्सवानिमित्त श्रीनिवास जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

टाळ्यांच्या कडकडाटातच पं. जयराज यांचे स्वरमंचावर आगमन झाले. ‘मंगलम भगवान विष्णू’ या मंगलाचरणानंतर ध्वनियंत्रणेशी ‘ॲडजेस्ट’ झाल्यावर त्यांनी ‘दरबारी कानडा’ रागामध्ये आपल्या प्रतिभेचे रंग भरले. त्यांना मुकुंद पेटकर यांनी हार्मोनिअमची, सत्यजित तळवलकर यांनी तबल्याची; तर रतनमोहन शर्मा, अंकिता जोशी आणि सीमंतिनी ठकार यांनी तानपुऱ्याची साथ केली.

**‘किराणा हेरिटेज’चे आज प्रकाशन**

सवाई गंधर्व संगीत महोत्सवामध्ये किराणा घराण्याचे युवा गायक आनंद भाटे यांच्या ‘किराणा हेरिटेज’ या अल्बमचे प्रकाशन शनिवारी (ता. ११) ज्येष्ठ गायिका मालिनी राजूरकर यांच्या हस्ते होणार आहे.

---

**पं. हरिप्रसाद चौरसिया यांचा सुरेल ‘सतांगी’**

‘टुडे’मध्ये ▶